# ६) श्रवण कसे करावे? ऐकावे कसे?

**ह. भ. प. श्री. सुभाष महाराज गेठे**

How to listen atteventively ?

बोलणाऱ्याला वक्ता व ऐकणाऱ्याला श्रोता म्हणतात.

कान हे ऐकण्याचे साधन आहे व शब्द हा कानाच्या ऐकण्याचा विषय आहे.

चांगले ऐकणे किंवा श्रवण करणे ही एक कला आहे. ती साध्य करण्यासाठी ऐकणाऱ्यांच्या ठिकाणी अनेक गुण असावे लागतात. ऐकण्याची तयारी करण्यासाठी अनेक सद्‌गुण आत्मसात करावे लागतात. ऐकण्याची सुरुवात अगदी बालपणापासून होत असते. कानाने ऐकून आणि डोळ्याने पाहून लहान मुले आणि मोठी व्यक्तीसुद्धा इतरांचे अनुकरण करत असतात. शालेय जीवनात ऐकण्याची सुरुवात अगदी छोट्या (बालवाडी) गटापासून होऊन विद्यापीठातील सर्वोच्च डिग्री इथपर्यंत विद्यार्थी शिक्षकांकडून वेगवेगळ्या ज्ञानशाखेतील ज्ञानग्रहण श्रवणाच्या माध्यमातूनच करत असतो.

सक्रिय आणि सावधानपूर्वक, आस्थापूर्वक, श्रद्धापूर्वक, अनन्यतेने श्रवण केले तर पुन्हा पुन्हा वाचण्याची फार गरज नसते. एकदाच आपण आई-वडिलांकडून 'याला पाणी म्हणतात' असे 'पाण्याला पाणी म्हणतात' हे ऐकल्यानंतर पुन्हा 'पाणी' शब्दाची आवृत्ती, पाठांतर किंवा स्मरण करावे लागत नाही, ते कायमचे लक्षात राहते. वेगवेगळ्या व्यक्तींना वेगवेगळ्या क्षेत्रांतील माहिती श्रवण करून लक्षात ठेवण्याचे कौशल्य असते. सगळ्यांना सगळे लक्षात ठेवता येत नाही किंवा एकाला सगळे लक्षात ठेवता येत नाही. काहींना

काहीच लक्षात ठेवता येते.

जेव्हा आपण ऐकतो तेव्हा बोलणाऱ्या वक्त्याविषयी आपल्या अंतःकरणात आदर, श्रद्धा व विश्वास असेल तर आपण कोणत्याच वाक्याची अवज्ञा किंवा अवहेलना करणार नाही.

पेरलेले बीज उगवण्यासाठी जशी चांगली सुपीक जमीन लागते तसे ऐकणाऱ्याचे कान सुपीक जमिनीप्रमाणे बहुगुणसंपन्न असावे लागतात, तरच वक्त्याच्या शब्दाचा उपयोग होतो. यासाठी ऐकणाऱ्याचे मन चांगले व बुद्धी शुद्ध आणि वक्त्याविषयी आदरभाव असेल तर कोणतीही गोष्ट सांगण्यासाठी वक्त्याला संकोच वाटत नाही.

**यालागीं सुमनु आणि शुद्धमती। जो अनिंदकु अनन्यगती ।**
**पैं गा गौप्यही परी तयाप्रती । चावळिजे सुखें।।४०।।** अ. ९

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायापासून ते अठराव्या अध्यायापर्यंत अनेक ठिकाणी अर्जुनाचे निमित्त करून 'ऐकावे कसे' आणि श्रीकृष्णाचे निमित्त करून 'बोलावे कसे' हे अनेक गुणवैशिष्ट्यांनी व रूपकांनी प्रतिपादित केले आहे. या सगळ्या विषयाचा एकत्रित आढावा घेतला तर 'ऐकावे कसे' या विषयावर स्वतंत्र प्रबंध तयार होईल. परंतु आपण येथे काही निवडक महत्त्वाच्या ओव्यांच्या द्वारे ऐकावे कसे हा विषय समजून घेऊ. वक्त्याशिवाय श्रोत्याला अन् श्रोत्याशिवाय वक्त्याला महत्त्व नाही. एकमेकांच्या सहभागित्वामुळे एकमेकांना महत्त्व आहे. थोडक्यात, वक्त्यामुळे श्रोत्याला व श्रोत्यामुळे वक्त्याला महत्त्व आहे.

**वक्ता तो वक्तचि नोहे । श्रोतेनिविण।।** अ. ९

श्री संत ज्ञानेश्वर महाराज हे स्वतः उत्तम निसर्ग निरीक्षक असल्यामुळे श्रवण कसे करावे याचे उत्तर निसर्गातील विविध उदाहरणांच्या माध्यमातून देऊन ऐकण्याचे कौशल्य आपण कसे

वाढवावे हे शिकवितात.

ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायामध्ये श्रवण कसे करावे हे सांगत असताना चकोर पक्ष्याच्या पिल्लांचा दृष्टांत देतात. शरद ऋतूमधील पौर्णिमेच्या रात्री १६ कलांनी परिपूर्ण असणाऱ्या चंद्राच्या किरणांमध्ये वनस्पतींना पुष्ट करणारे बारीक आणि सूक्ष्म अमृतकण असतात. ते अमृतकण वेचण्याचे कौशल्य, नाजूकता आणि हळुवारपणा चकोरांच्या पिल्लांच्या ठिकाणी असतो. ती चकोर तलगे प्रसन्न मनाने हळुवारपणे, सतर्कतेने चंद्रकिरणातील अमृतकण वेचत असतात.

इतर कोणत्याही गोष्टीकडे त्यांचे लक्ष नसते. केवळ अमृतकणांशी अनन्य होऊन चंद्रामृताचे पान करत असतात. त्याप्रमाणे ऐकणाऱ्या श्रोत्याच्या मनामध्ये रजोगुण व तमोगुण नसावा, म्हणजे खूप चंचलता नसावी आणि आळस नसावा, शरीर खूप थकलेले नसावे, खूप विचारांचे थैमान मनात नसावे. थोडक्यात, मन प्रसन्न, अंतर्मुख, शांत आणि स्थिर ठेवून चकोरांच्या पिल्लांप्रमाणे श्रवण करावे.

**शारदियेचे चंद्रकळे । माजी अमृतकण कोवळे ।**
**ते वेचिती मने मवाळे । चकोर तलगे।।५६।।**
**तियापरी श्रोता । अनुभवावी हे कथा ।**
**अति हळुवारपण चित्ता । आणुनियां।।५७।।** अ. १

वक्ता आणि श्रोता यांच्यामध्ये सम्यक, समतोल आणि सुमधुर समन्वय जर साधला गेला तर वक्त्याच्या मुखातून शब्द बाहेर पडण्याच्या अगोदरच आणि ते शब्द इंद्रियांच्या द्वारे बुद्धीला आकलन होण्याच्या अगोदरच वक्त्याच्या मनातील भाव श्रोत्याच्या मनाला प्रत्यक्ष भावला जातो, समजला जातो. तिथे शब्दाशिवाय संवाद सुरू होतो आणि इंद्रियाच्या मदतीशिवाय आकलन सुरू होते. हा अपूर्व कौशल्याचा योग भ्रमर, मकरंद आणि कमळ या दृष्टांतातून श्री संत

ज्ञानेश्वर महाराज समजावून सांगतात. भ्रमर म्हणजे भुंगा, फुलातील मकरंद म्हणजे सुगंध घेण्यास जेव्हा येतो तेव्हा तो आपला आवाज बंद करतो, आपली चाल मंद करतो, इतक्या हळुवारतेने फुलातील मकरंद सेवन करून निघून जातो. हे आपल्यावर बसून भ्रमर कधी उठून गेला हे पाकळ्यांनाही समजत नाही व तो भ्रमरही पाकळ्यांना समजू देत नाही. इतक्या हळुवारपणे वर्गातील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या बोलण्याचे श्रवण करावे.

**हे शब्देविण संवादिजे। इंदियां नेणता भोगिजे ।**
**बोलाआधि झोंबिजे । प्रमेयासी।।५८।।**
**जैसे भ्रमर परागु नेती। परी कमळदळे नेणती ।**
**तैसी परी आहे सेविती। ग्रंथी इये।।५९।।** अ. १

चांगले श्रवण करताना बोलणाऱ्या वक्त्याच्या शब्दांच्या पाठीमागचा भाव जो चांगला समजून घेतो तोच चांगला श्रोता होतो. शब्दांपेक्षा त्या मागचा भाव अतिशय महत्त्वाचा असतो.

ज्ञानदेवांनी भगवान श्रीकृष्णाचा भावच ज्ञानेश्वरीच्या रूपाने मांडला आहे.

शब्द, अर्थ, भाव, अर्थरूपता आणि प्रत्यक्ष अनुभव इत्यादी महत्त्वाच्या गुणांचा समग्र भाव जेव्हा चांगल्या रीतीने ग्रहण केला जातो, तेव्हा श्रोत्याला अगस्ती ऋषीची उपमा दिली जाते. अगस्तीनी एका घोटात समग्र समुद्र प्राशन केला, तसा चांगल्या श्रोत्यांचा राजा असलेला अर्जुन रूपी अगस्ती हा श्रीकृष्ण वचनामृताचा सागरच एका क्षणात ग्रहण करण्यास प्रवृत्त होतो. तसे आपण अर्जुनाप्रमाणे चांगले ऐकावे, असे श्री संत ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

**श्रीकृष्णोक्तिसागरा । हा अगस्तीचि दुसरा ।**
**म्हणोनि घोंटू भरों पाहे एकसरा। अवघेयाचा।।७०।।** अ. १५

आकाशात चंद्र दिसू लागला की चंद्रविकासिनी कमलिनी प्रफुल्ल होऊन आपली जमिनीवरील जागा न सोडता त्याला आलिंगन देते. हे प्रेमसुख कसे भोगावे हे तिलाच (कमळाला) माहिती! त्याप्रमाणे गंभीर व शांत अंतःकरणाने युक्त असणारा जो श्रोता तोच या ग्रंथाचे रहस्य जाणू शकतो.

श्री ज्ञानेश्वर महाराज उपस्थितांना बोलतात की अर्जुनाच्या पंगतीला बसून ऐकण्याची ज्यांची योग्यता असेल त्यांनी कृपा करून माझ्याकडे लक्ष द्यावे.

**का आपुला ठावो न सांडिता। आलिंगिजे चंदु प्रकटता ।**
**हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणे।।६०।।**

**ऐसेनि गंभीरपणे । स्थिरावलेनि अंतःकरणे ।**
**आथिला तोचि जाणे । मानूं इये।।६१।।**

**अहो अर्जुनाचिये पांती। जे परिसणया योग्य होती ।**
**तिहीं कृपा करून संती। अवधान द्यावे।।६२।।** अ. १

अर्जुनासारखी ऐकण्याची योग्यता तत्कालीन कुणाच्याच मध्ये नव्हती. म्हणून भगवंताने पिता वसुदेवाला, माता देवकीला, बंधू बलरामाला, लक्ष्मीला आणि सनकादिकांनाही न सांगता केवळ अर्जुनालाच गीता सांगितली.

**तरि प्रस्तुत आतां गुणी इहीं । तू वांचून आणिक नाहीं ।**
**म्हणौनि गुज तरी तुझ्या ठायी । लपऊं नये।।४१।।** अ. ९

अर्जुन हा प्रतिकूल परिस्थितीतही (युद्ध परिस्थितीत) ऐकू शकला. विद्यार्थ्यांना तर ऐकण्याचे किती चांगले अनुकूल वातावरण आहे, मग विद्यार्थ्यांनी किती चांगले ऐकले पाहिजे?

उत्तम श्रोत्याला उत्तम वक्त्याकडून सर्वश्रेष्ठ विषय ऐकायला

मिळणे हे खरोखर श्रोत्याच्या श्रवण इंद्रियाचे भाग्य आहे, असा संदर्भ श्री संत ज्ञानेश्वर महाराज श्रीकृष्ण, अर्जुन आणि गीता यांच्या माध्यमातून देतात. शब्द हा जरी कान या इंद्रियाचा विषय असला तरी तो कानाचा विषय इतका सर्वश्रेष्ठ आहे की इतर इंद्रियांना वाटावे की कान जसे इंद्रिय आहे तसे आम्हीही इंद्रिय आहोत. आमच्या मध्ये 'इंद्रियत्व' समान आहे. मग आम्हाला ज्ञानेश्वरी (गीता) ऐकण्याचे भाग्य का मिळू नये? असा इंद्रियांच्या मधील प्रेमाच्या भांडणाचा संवाद श्री संत ज्ञानदेव श्रोत्यांना ऐकवितात.

रसनेन्द्रियाला असे वाटते की शब्दातील रस हा माझा विषय आहे, घ्राणेंद्रियाला असे वाटते की शब्द हाच एक मकरंद, तो माझा विषय आहे. शब्दातील अपूर्व सुंदर अक्षर रचना हेच उत्तम रूप, हे तर माझा पाहण्याचा विषय आहे असे डोळा म्हणतो. संपूर्ण वाक्य तयार झाल्यानंतर त्यातील भाव, अर्थ ग्रहण करणे हा तर माझा विषय आहे असे समजून सर्व इंद्रियांना मागे टाकून मन जणू काही शब्दब्रह्माला आलिंगन देण्यासाठी सर्वांच्या अगोदर पुढे सरसावते. याप्रमाणे सर्व इंद्रियांना आपापले विषय एका शब्दाच्याच ठिकाणी दिसतात आणि शब्दरूपी चिंतामणी हाही सर्व इंद्रियाचे एकटा समाधान करतो.

जसा एक सूर्यच सहस्र किरणांद्वारे सर्व जगाला जागवतो, याप्रमाणे चांगले ऐकण्याची वृत्ती इतकी विकसित करावी की सर्व इंद्रिये एकत्रित येऊन कानाच्या माध्यमातून उत्तम श्रवण करतील असा भाव साहित्यिक परिभाषेमध्ये श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या चौथ्या व सहाव्या अध्यायाच्या प्रारंभाला प्रकट केला आहे.

**आजि श्रवणेंद्रियां पाहलें । जे येणे गीतानिधान देखिलें ।**
**आतां स्वप्नचि हे तुकलें । साचासरिसें।।१।।** अ. ४

**आतां इंद्रियजात आघवें । तिहीं श्रवणाचें घर रिघावें।**
**मग संवादसुख भोगावें । गीताख्य हे।।५।।** अ. ४

**ऐका रसाळपणाचिया लोभा । की श्रवणींचि होति जिभा ।**
**बोले इंद्रियां लागे कळंभा । एकमेकां।।१६।।** अ. ६

**सहजें शब्दु तरि विषो श्रवणाचा ।**
**परि रसना म्हणे हा रसु आमुचा ।**
**घ्राणासि भावो जाय परिमळाचा । हा तोचि होईल।।१७।।**

**नवल बोलतीये रेखेची वाहणी ।**
**देखतां डोळ्यांही पुरों लागे धणी।**
**ते म्हणती उघडली खाणी । रूपाची हे।।१८।।**

**जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मनचि धांवे बाहिरें ।**
**बोलु भुजाहि आविष्करें । आलिंगावया।।१९।।**

**ऐशी इंद्रिये आपुललिया भावीं ।**
**झोंबती परि तो सरिसेपणेंचि बुझावी ।**
**जैसा एकला जग चेववी । सहस्त्रकरु।।२०।।**

**तैसें शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण ।**
**पाहातयां भावज्ञां फावती गुण । चिंतामणीचे।।२१।।** अ. ६